11

दिनांक २४/०३/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**ई.लो.से. श्री. शेख फैसल मोहमद इकबाल, वय 43 वर्षे, व्यवसाय-खाजगी एजंट, रा. प्लॉट नं.100, अन्सार कॉलनी, अन्सार मस्जिदजवळ पडेगांव औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.50,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे छावणी,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | शेख फैसल मोहमद इकबाल, वय 43 वर्षे, व्यवसाय-खाजगी एजंट, रा. प्लॉट नं.100, अन्सार कॉलनी, अन्सार मस्जिदजवळ पडेगांव औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 50,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 50,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे वावे वडखल मस्जिद, मौ.वावे वडखल ता.पेन जि.रायगड मस्जिद बाबत निकाल तक्रारदार यांचे बाजुने लावुन देणेकामी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे वावे वडखल मशिद, मौ.वावे वडखल ता.पेन जि.रायगड मशिदचे व्यवस्थापकीय समितीची फेर बदल बाबत वाद चालु असून सदर प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे आहे. मशिदबाबत तक्रारदार यांचे बाजुने निकाल लावुन देणेकामी ई.लो.से. शेख फैसल यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, ई.लो.से. शेख फैसल यांनी 50,000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 24/03/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, ई.लो.से. श्री. शेख फैसल यांनी पंच साक्षीदारासमक्ष टरलेली लाचेची रक्कम 50,000/- रुपये स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे.छावणी,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/साईनाथ तोडकर, केवलसिंग घुसिंगे, मिलींद इप्पर, चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644944
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.